उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३०६ ■ शनिवार ८ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

सोशल मीडियावर आता केंद्र सरकारचा अंकुश दोन तासात मजकूर हटविणे बंधनकारक

नवी दिल्ली, दि. ७ : केंद्र सरकारने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्ससाठी आक्षेपार्ह आणि संवेदनशील मजकूर हटवण्याच्या मुदतीत कपात केली आहे. यापुर्वी अशा प्रकारच्या मजकुरावर कारवाई करण्यासाठी चोवीस तासांचा वेळ दिला जात होता. मात्र, नव्या नियमांनुसार आता अवघ्या दोन तासांच्या आत असा मजकूर प्लॅटफॉर्मवरून हटवणे बंधनकारक करण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान नियम २०२१ मध्ये १० फेब्रुवारी २०२६ रोजी सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्या अंतर्गत हे नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. मुख्यत्वे डीपफेक आणि एआयच्या साहाय्याने तयार करण्यात आलेल्या बनावट किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीला डिजिटल विश्वात आळा घालणे, हा यामागील मुख्य उद्देश आहे. दरम्यान, आम आदमी पक्षाचे संयोजन अरविंद केजरीवाल यानी या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर केंद्रावर निशाणा साधला आहे. देशातील जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न कराल तेवढी जनता पेटून उठेल, असा इशारा त्यांनी दिला.

नग्नता किंवा एखाद्याची बनावट ओळख सांगणाऱ्या आक्षेपार्ह सामग्रीबाबतच्या तक्रारींवर पुर्वीच्या चोवीस तासांऐवजी आता दोन तासांच्या आत कारवाई करावी लागणार आहे. न्यायालय किंवा सक्षम सरकारी प्राधिकरणाकडून वैध आणि सकारण आदेश प्राप्त झाल्यानंतर बेकायदेशीर मजकूर हटवण्यासाठी आधी ३६ तासांची मुदत होती; आता ही कारवाई तीन तासांच्या आत करावी लागेल.

तक्रारींना उत्तर द्यावे लागेल याशिवाय सामान्यांच्या तक्रारींनाही तात्काळ उत्तर द्यावे लागणार आहे. वापरकर्त्यांच्या सामान्य तक्रारींचे निवारण करण्याची मुदत ७२ तासांवरून कमी करून (पान ४ वर)

एससी-एसटी आरक्षणात क्रिमीलिअर लागू नाही

नवी दिल्ली, दि. ७ : केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून स्पष्ट केले आहे की, अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) च्या आरक्षणात क्रिमीलिअर तत्त्व लागू होत नाही. सरकारने या प्रकरणी त्या जनहित याचिकांना विरोध केला आहे. ज्यात एससी-एसटी आरक्षणात क्रिमीलिअर लागू करण्याची आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणासाठी अधिक न्यायसंगत धोरण बनवण्याची मागणी करण्यात आली होती.

यासंदर्भात केंद्राने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, याचिकांमध्ये संविधानांतर्गत मिळालेल्या कोणत्याही मूलभूत अधिकाराच्या उल्लंघनाचा उल्लेख नाही. तसेच, क्रिमीलिअरचा नियम एससी-एसटीवर लागू होतो, असे कुठेही नमूद केलेले (पान ४ वर)

जि.तील नऊ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात एकोणनव्वद को.चा निधी वर्ग- ना.रावल

धुळे, दि.७- राज्य शासनाच्या अत्यंत महत्वाकांक्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत मुंबई येथे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम वर्ग करण्यात आली. धुळे जिल्ह्यातील ९ हजार २० शेतकऱ्यांच्या खात्यात ८९ कोटी ७४ लाख ५१ हजार ९५५ रुपये एवढी रक्कम वर्ग करण्यात आली. राज्याचे पणन व राजशिष्टाचार तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी ही माहिती दिली आहे.

राज्यातील शेतकरी हा राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे काही वेळेस पिकांचे नुकसान होते. त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकतनाही. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकाकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यानुसार जिल्ह्यातील ९ हजार २० शेतकऱ्यांना ८९ कोटी ७४ लाख ५१ हजार ९५५ रुपयांचा लाभ देण्यात आला. ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली. यात धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ३ हजार ५९६ शेतकरी सभासदांना ३२ कोटी १३ लाख ९९ हजार ४०७ रुपये एवढ्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे.

राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ मिळेल. पहिल्या यादीतील (पान ४ वर)

नंदुरबार जिल्ह्यातील अल्पवयीनांचे शोषण एसआयटी मार्फत चौकशी करा- प्रतिभा शिंदे

नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात उघडकीस आलेले अल्पवयीन बालकांसह युवकांचे लैंगिक शोषण, त्यांचे अश्लील चित्रफिती व छायाचित्रे तयार करून ब्लॅकमेल करत दीर्घकाळ अत्याचार केल्याचे कथित प्रकरण अत्यंत धक्कादायक, संतापजनक आणि संपूर्ण समाजाला अस्वस्थ करणारे आहे. अशा विकृत स्वरूपाच्या गुन्ह्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घालता येणार नाही. या प्रकरणातील प्रत्येक दोषीला कायद्याच्या चौकटीत राहून कठोरात कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्या प्रतिभाताई शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

प्राथमिकमाहितीनुसार, २०२२ पासून अल्पवयीन मुलांसह काही युवकांचे लैंगिक शोषण करून त्यांचे अश्लील व्हिडिओ आणि छायाचित्रे तयार करण्यात आली. त्यांचा आधार घेत पीडितांना धमकावत वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा आरोप आहे. तपासादरम्यान संशयिताच्या मोबाईलमधून हून अधिक आक्षेपार्ह चित्रफिती आढळून आल्याची बाब अत्यंत गंभीर असून, या प्रकरणाची व्याप्ती मोठी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर या संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथक स्थापन करून सखोल, निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी करण्यात यावी. या गुन्ह्यामागे अन्य कोणत्याही व्यक्तींचा सहभाग, संगनमत किंवा रॅकेट कार्यरत होते का, याचाही सर्वंकष तपास करणे अत्यावश्यक आहे. या प्रकरणातील सर्व संभाव्य पीडितांचा शोध घेऊन त्यांना आवश्यक कायदेशीर, वैद्यकीय आणि मानसिक (पान ४ वर)

भागवतांचे प्रमाणपत्र तरुणांना नकोय - प्रियंका

नवी दिल्ली, दि. ७ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी मुंबईत जेन-झी आणि जेन-अल्फा पिढीतील तरुणांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आंदोलक जेन-झी ऑण्टिनॅशनल नाहीत, असे मत मांडले. त्यांच्या या वक्तव्यावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली. काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी भागवतांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली. राजधानी दिल्लीत संसद भवन परिसरात प्रियंका गांधी यांनी देशातील तरुणांना आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांच्याकडून कोणत्याही प्रमाणपत्राची गरज नसल्याचे त्यांनी सुनावले.

दरम्यान, कर्नाटकचे मंत्री व काँग्रेस नेते (पान ४ वर)

विजय चौधरी यांना चार दिवसांची पोलीस कोठडी ऑडिओ क्लिप व शिवीगाळ प्रकरणाच्या तपासाला वेग

नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष विजय वसंत चौधरी यांना अनुसूचित जमातीच्या महिलेचा अपमान, जातीवाचक शब्दांचा वापर आणि कथित व्हायरल ऑडिओ क्लिप प्रकरणी नंदुरबार जिल्हा व सत्र न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने धुळे येथून त्यांना अटक केली होती.

नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्र. ६९९/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (बीएनएस)-२०२३ मधील संबंधित कलमे तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी दुपारी कडक पोलीस बंदोबस्तात विजय चौधरी यांना न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

दरम्यान, विजय चौधरी यांचा मुलगा मंदार चौधरी यालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. प्राथमिक चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याला सोडून देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. विजय चौधरी यांची कथित ऑडिओ क्लिप राज्यभर व्हायरल झाल्यानंतर मोठी राजकीय खळबळ उडाली होती. विशेषतः उत्तर महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात या प्रकरणाची जोरदार चर्चा झाली. या कथित ऑडिओ क्लिपमुळे भाजपची प्रतिमा मलिन झाल्याची टीका विरोधकांकडून करण्यात आली असून, पक्षातील काही पदाधिकारी (पान ४ वर)

घरफोडी करुन पळणाऱ्या दोघांना मुद्देमालासह अटक

धुळे, दि.७- येथील आमदार अनुप अग्रवाल यांच्या कार्यालयात चोरी करून पळणाऱ्या दोघांना शहर पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली.

धुळे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस पथक गस्तीवर होते. बुधवारी पहाटे पुर्वी शहरातील गुरु शिष्य स्मारकाजवळ आमदार अनुप अग्रवाल यांचे जुने कार्यालयाचे शटर अर्धवट उघडे दिसले. पोलिसांनी संशयावरुन तेथे पाहणी केली असता चोरी झाल्याचे समजले. पोलिसांनी लागलीच परिसरात शोध सुरू केला असतांना दोन जण राजवाडे बँकेकडे पळतांना दिसले. पोलिसांनी (पान ४ वर)

आमदार कार्यालयात चोरी करणारे दोन चोर पोलिसांनी केले गजाआड

धुळे, दि. ७ (प्रतिनिधी) - आमदार अनुप अग्रवाल यांच्या जुन्या कार्यालयाचे कुलूप तोडून चोरी करणाऱ्या दोन सराईत चोरांना धुळे शहर पोलिसांच्या शोध पथकाने अटक केली. संशयित आरोपींकडून चोरीचा मुद्देमाल तसेच घरफोडीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चार आणि पाच ऑगस्टच्या मध्यरात्री धुळे शहर पोलीस ठाण्याचे शोध पथक शहरात रात्री गस्त घालत होते. पहाटे सुमारे तीनच्या सुमारास गुरु-शिष्य स्मारकाजवळ आमदार अनुप अग्रवाल यांच्या जुन्या कार्यालयाचे शटर अर्धवट उघडे असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. संशय आल्याने पाहणी केली असता कार्यालयात चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी परिसराची नाकाबंदी करून शोधमोहीम सुरू केली. त्याचवेळी राजवाडे बँकेच्या दिशेने पळून जाणाऱ्या दोन संशयितांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्यात (पान ४ वर)

शहरातील खंडीत वीज पुरवठ्या विषयी काँग्रेसने शहर अभियंत्यांना दिले निवेदन

धुळे दि. ७ (प्रतिनिधी) : शहरातील विविध भागांत गेल्या काही दिवसांपासून दररोज तब्बल आठ ते दहा तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांसह व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या समस्येच्या निषेधार्थ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने महावितरणच्या धुळे शहर कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शहरातील वडजाई रोड, लालबाग, पारोळा रोड, रामवाडी, आझाद नगर, शंभर फूटी रोड, मौलवी गंज, पेठ बाजार, हजार खोली, जामचा मळा, कबीर गंज, अविष्कार कॉलनी आणि मच्छी बाजार या परिसरांमध्ये वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. काँग्रेसने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधीत भागातील डीपीवर (डिस्ट्रिब्युशन पॉईंट) स्विच नसल्यामुळे एखाद्या ठिकाणी बिघाड झाल्यास संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा बंद होतो. त्यामुळे नागरिकांना अनेक तास अंधारात राहावे लागते. डीपीवर स्विच बसवल्यास केवळ बिघाड झालेल्या भागातील वीज बंद करून दुरुस्ती करता येईल आणि नागरिकांची (पान ४ वर)

कुंडाणे येथे बनावट दारूचा कारखाना उद्ध्वस्त एक अटकेत, सव्वाचार लाखाचा मुद्देमाल जप्त

धुळे, दि. ७ - तालुका पोलिसांनी कुंडाणे शिवारात सुरू असलेल्या बनावट देशी आणि विदेशी बनावटीच्या दारू निर्मितीच्या कारखान्यावर धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत बनावट दारू, दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे रसायन, यंत्रसामग्री आणि अन्य साहित्य, असा एकूण चार लाख १८ हजार १६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी धुळ्यात राहणारा इरफान रऊफ पटेल यास अटक करण्यात आली आहे.

धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांना पाच ऑगस्टला कुंडाणे गावाच्या शिवारातील शेत गट क्रमांक १९९/१/अ/१/ब मधील एका बंदिस्त घरात बनावट दारू तयार करून तिची विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पाच ऑगस्टला दुपारी सुमारे चार वाजता पोलिसांच्या पथकाने संशयित ठिकाणी छापा टाकला. छाप्यामध्ये बनावट रॉयल चॅलेंज व्हिस्कीच्या एक हजार १८० बाटल्या, सुगंधी संत्रा आणि प्रिन्स संत्रा या देशी बनावटीच्या दारूच्या हजारो बाटल्या, सुमारे एक हजार लिटर रसायन, वॉटर प्युरीफायर मशीन, बुच पॅकिंग मशीन तसेच रिकाम्या बाटल्यांचा मोठा साठा आढळून आला. पोलिसांनी हा संपूर्ण मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलीस शिपाई विशाल भालचंद्र पाटील यांच्या फिर्यादीवरून मुख्य आरोपी इरफान रऊफ पटेल (वय ४१, रा. मोगलाई, साक्री रोड, धुळे) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र मद्यनिषेध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली (पान ४ वर)

कट्टा बाळगणाऱ्या दोघांना अटक

धुळे, दि.७- दहशत माजविण्याचे उद्देशाने गावठी कट्टा (पिस्तूल) व एक जिवंत राऊंड बाळगणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले. नवलनगर (ता. धुळे) येथून दोघांना अटक केली असून मूळ सूत्रधाराचा पोलीस शोध घेत आहेत.

नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक, धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक धुळे यांनी अवैध शस्त्रांचा शोध घेवुन कारवाई करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना माहिती मिळाली. त्याआधारे नवलनगर जवळील पेट्रोल पंप समोरील रस्त्यावर जगदीश पुंडलीक पाटील (वय २३), अजय पितांबर भिल (वय १९, दोन्ही रा. पिंपळकोठा ता. पारोळा) यांना ताब्यात घेत झडती घेतली. त्यांच्याकडे विना परवाना एक गावठी कट्टा, एक जिवंत राऊंड आढळले. ४५ हजार रुपयांचे पिस्तूल काढतोस आणि चाळीस हजारांची मोटरसायकल (एमएच५४/डी २१५१) असा एकूण ८१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोघा संशयितांविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल झाला.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,37,400 रु.+3% GST
सोने- 24 K -1,50,000 रु.+3% GST
चांदी- 2,37,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

सोनगीर परिसरात चोरट्यांचा धुमाकुळ रात्रीतुन चाळीस शेळ्या-मेंढ्या लंपास

सोनगीर दि.७(प्रतिनिधी) - सोनगीर व परिसरात शेळ्या-मेंढ्या चोरणाऱ्या अज्ञात टोळीने पुन्हा एकदा डोके वर काढले असून गुरुवारी मध्यरात्री चोरट्यांनी सोनगीर आणि वाघाडी येथून तब्बल ४० शेळ्या-मेंढ्या लंपास केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. अवघ्या एक किलोमीटरच्या परिघात एकाच रात्री झालेल्या या धाडसी चोऱ्यांमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड भीतीचे व संतापाचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, सोनगीर येथील वाघाडी रस्त्यालगत असलेल्या अहिल्या नगर भागातील गुठा सोमा ठेलारी हे मेंढपाळ व्यवसायानिमित्त तेथे राहतात. त्यांचा मेंढ्यांचा वाडा घरापासून काही अंतरावर सोनगीर-वाघाडी रस्त्यालगत आहे. गुरुवारी मध्यरात्री १ ते २ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी वाड्यात शिरून कळपातील सुमारे २५ मेंढ्या चोरून नेल्या. चोरीस गेलेल्या या मेंढ्यांची किंमत सुमारे तीन लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

या घटनेनंतर काहीच वेळात आणि थोड्याच अंतरावर असलेल्या वाघाडी खुर्द येथील सुरेश नामदेव भिल या पशुपालकाच्या घराच्या अंगणात बांधलेल्या १७ शेळ्यांवरही चोरट्यांनी डल्ला मारला. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत अज्ञात चोरांनी या सर्व शेळ्या चोरून नेल्या.

दोन वर्षांपासून टोळी सक्रिय; पोलिसांचे अपयश?

गेल्या दोन वर्षांपासून सोनगीर, शिंदखेडा व नरडाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेळ्या-मेंढ्या चोरीची टोळी सातत्याने सक्रिय आहे. यापूर्वी सोनगीर, नरडाणा आणि शिंदखेडा पोलिसांत चोरीचे अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र, अद्याप एकाही गुन्ह्याचा सुगावा पोलिसांना लावता आलेला नाही. पोलिसांच्या या ढिम्म कारभारामुळे (पान ४ वर)

छ.शिवाजी महाराज स्मारक रस्ता पंधरा दिवसांसाठी बंद

धुळे, दि.७- शहरातील मनोहर टॉकीजजवळील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम करण्यात येणार असल्याने दि.८ ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त नितीन कापडणीस यांनी केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २३६ व २३७ अन्वये शहरातील सिमेंट जलकुंभ ते श्रीराम पेट्रोल पंप पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. नागरिकांनी वाहतूक बदलाची नोंद घेवून पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे कळविण्यात आले आहे.

धुळ्यात सण-उत्सवांच्या पार्श्वभुमीवर सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई

धुळे, दि.७- सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्यातील बारा जणांवर हद्दपारची कारवाई करण्यात आली. जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे या संदर्भातले आदेश काढण्यात आले.

आगामी सण-उत्सव शांततापुर्वक, सुरक्षित आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन पार पडावेत, या उद्देशाने धुळे जिल्हा पोलीस प्रशासनातर्फे समाजकंटक व सराईत गुन्हेगारांविरुध्द प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय योजना राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने धुळे जिल्हयात सातत्याने गंभीर स्वरुपाचे गुन्हे करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर तसेच गुन्हे टोळ्यांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ५५ व ५६ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन हद्दपारीची कठोर कारवाई करण्यात आली.

सद्यस्थितीत हद्दपारीचा आदेश लागू असलेल्या दोन गुन्हेगारी टोळ्यातील चार सदस्य, आठ वैयक्तीक सराईत गुन्हेगार असे एकुण बारा हद्दपार गुन्हेगारांची माहिती नागरिकांच्या माहितीसाठी जाहीर करण्यात आली. त्यात सुलतान खालीद पिंजारी (वय ३१, इस्लामपुरा, (पान २ वर)

विश्व आदिवासी दिनानिमित्त

मा.खा.हिना गावितांच्या अध्यक्षतेखाली वाण्याविहिरला भव्य रक्तदान शिबीर

अक्कलकुवा, दि.६ (प्रतिनिधी)- तालुक्यातील वाण्याविहीर येथे विश्व आदिवासी दिनाच्या पार्श्वभूमीवर भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे आयोजन विद्या विकास संस्थेचे अध्यक्ष तथा विधानसभा निवडणूक प्रमुख नागेश पाडवी यांनी केले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी खा.हिना गावित होत्या तर प्रमुख अतिथी अक्कलकुवा येथील पोलीस निरीक्षक अर्जुन पटले, विद्या विकास संस्थेचे सचिव प्रभाकर उगले, माजी जिल्हा परिषद सदस्य नितेश वळवी, प्रताप वसावे, किरसिंग वसावे, माजी पंचायत समिती सदस्य ड.सुधीर पाडवी, अशोक राऊत, किशोर पाडवी, धनसिंग वसावे, जगदीश वसावे, सरपंच चंपाबाई पाडवी, भूपेंद्र पाडवी, ड. मिलन वळवी, रायसिंग वळवी, आकाश वसावे, जयमल पाडवी, किसन नाईक, नरेश पाडवी, सुनील राव, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद कामे, कथ्थुराम सैंदाणे, जनकल्याण (पान ४ वर)

आपला महाराष्ट्र

हातमाग दिनाचा खरा हकदार : सेवाग्राम आश्रम

काल राष्ट्रीय हातमाग दिन साजरा झाला. त्यानिमित्त देशातील उच्चपदस्थांनी कार्यक्रमात हजेरी लावली. २०१५ पासून या दिवसाचे महत्व अधोरेखीत करण्यात आले असले तरी भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या काळातच स्वदेशी चळवळीचा एक भाग म्हणून ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी हातमागाचा पुरस्कार करण्यात आला होता. याचा अर्थ तेव्हा पासूनच हातमागाचे महत्व आहे. आज हातमागाला प्रोत्साहन देण्याची फक्त भाषा वापरली जाते. प्रत्यक्षात विणकर देशोधडीला लागले आहेत. खादीचे उत्पादन आणि चरखा ह्या संकल्पना फक्त तोंडी लावण्या पुरता शिल्लक आहेत. खादी वापरण्याचा सल्ला दिल्लीतून देण्यात येतो मात्र प्रत्यक्षात खादी संस्थांची मानगुटी आवळून त्यांचा अंत केला जात आहे. असे असतांनाच खादीचा खप दुप्पट वाढला असे मनकी बातमध्ये आवर्जून सांगितले जाते. त्याचे प्रसारण देशभर केले जाते आणि स्वत:तीच पाठ थोपटून घेतली जाते. मग खादी एवढी येते कुठून असा प्रश्न सहजच उपस्थित होतो.या प्रश्नाचे उत्तर मील मध्ये बनलेल्या खादीच्या उत्पादनात आहे. भांडवलदारांच्या कापड गिरण्यांना खादी तयार करण्यास सांगण्यात आले.त्यांनी आज्ञा पाळली आणि मोठ्या प्रमाणावर खादी बाजारात आली. मात्र अशाप्रकारची खादी असूच शकत नाही. ती खादीची राजरोस हत्या आहे.तरीही या देशांत हातमाग दिन साजरा केला जातो हे मोठे आश्चर्यच म्हणावे लागेल.

महाराष्ट्रात खादी ग्रामोद्योग मंडळ आहे.मात्र ते कोणते उद्योग करते ते मंडळ चालविणाऱ्यांनाही कळत नसेल.शासनाने खादीच्या तत्वज्ञानाचा पार भुगा करून ठेवलेला आहे.राष्ट्रध्वजाचेही तसेच आहे. त्याचे व्यापारीकरण करण्यासाठी ध्वज संहिता बदलली आणि अगदी पॉलिस्टरचे, मीलच्या कापडाचे, प्लॅस्टिकचे ध्वज तयार करण्यास परवानगी देऊन मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यास सांगण्यात आले. लगेच हर घर तिरंगा घर घर तिरंगा अशी घोषणा करून आम्ही कसे राष्ट्रप्रेमी आहोत असे दाखविण्याचा भास निर्माण करण्यात आला. ज्यांनी स्वातंत्र्य मिळाले तेव्हा तिरंगा नाकारला होता. सुमारे साठ वर्षांपर्यंत ज्यांनी आपल्या कचेरीवर तिरंगा फडकूच दिला नाही. त्यांनी घर घर तिरंग्याची आणि त्यासाठी संहिता गुंडाळून ध्वज तयार करण्याची योजना अमलात आणली. वास्तविक तिरंगा ध्वज फक्त आणि फक्त खादीचाच असावा असाच नियम होता त्यास फाटा देऊन राष्ट्रध्वजाचा बाजार मांडण्यात आला. त्यामुळे राष्ट्रध्वज तयार करणाऱ्या खादी संस्थांना घर घर लागली. महात्मा गांधीजींच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील जनतेला मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करून देणारा चरखा व त्यावर आधारित कापड उद्योग संपविण्यासाठीच विद्यमान राजकीय व्यवस्थेने बड्या भांडवलदारांना प्रोत्साहन दिले आहे.हा केवळ आरोप नसून वास्तव आहे.ही व्यवस्था व त्या व्यवस्थेचे पाहरेकरी एवढ्यावरच थांबलेले नाहीत तर त्यांनी अ–सरकारी खादी तयार करणाऱ्या संस्थांना देखील तंग केले. सेवाग्राम आश्रमातील खादी भांडारात जी खादी तयार होते आणि विकली जाते ती प्रमाणित नाही त्यामुळे विकता येणार नाही असे फर्मान खादी ग्रामोद्योग आयोगाने काढले होते. म्हणजे जी चरख्यावर कातली जाते, हातमागावर विणली जाते ती अप्रमाणित आणि मील मध्ये तयार होते ती प्रमाणित हा अजब न्याय वर्तुळाचा म्हणावा लागेल

अशा प्रकारची सर्व संकटे समोर दत्त म्हणून उभी असताना सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानने खादी उत्पादनामध्ये विक्रम नोंदविला आहे. सन २०१७ पासून कापूस ते कापड हा प्रयोग सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानने सुरू केला . दिवंगत सर्वोदयी नेते जयवंत मठकर त्याकाळी आश्रम प्रतिष्ठानचे अध्यक्ष होते. त्यांची ही संकल्पना सेक्रेटरी डॉ.श्रीराम जाधव यांनी उचलून धरली आणि यशस्वी केली. सध्या आशाताई बोथरा (राजस्थान) अध्यक्ष असून गांधी आणि समाजवादी विचारसरणीचे विजय तांबे सेक्रेटरी आहेत.त्यांनी कापूस ते कापड संकल्पना पुढे नेऊन गेल्या वर्षी सोळा हजार मीटर खादीची निर्मिती केली. त्यातून ४८ लाख रूपयांची विक्री झाली आहे. हा पूर्ण स्वावलंबी ग्रामोद्योगात नोंदविलेला पराक्रमच म्हणावा लागेल. तिथे तयार झालेल्या कापडासाठी जो रंग वापरतात तो पूर्णपणे नैसर्गिकरीत्या तयार केलेला असतो. त्यासाठी हरडा बिहाडा, झेंडूची फुले, काथ, पळसाची फुले आदी वनस्पतींचा वापर होतो. स्वत:च्या शेतात आश्रम कापूस पिकवतो. त्यापासून धागा तयार करणे, हातमागावर विणकाम करणे आदी प्रक्रिया होतात. ही कामे करण्यासाठी प्रशिक्षित तीस महिलांना रोजगार दिला जातो. त्या सर्व महिला स्थानिक आहेत. अशा प्रकारे हातमाग दिनच साजरा करावयाचा असेल तर तो आश्रमा सारखा प्रयोग करूनच सरकारने साजरा केला पाहिजे. नुसती औपचारिकता काहीच कामाची नाही.

या संदर्भात अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे देखील कौतुक केले पाहिजे.हे मंडळ चरख्याचे प्रशिक्षण, त्यासाठी अंबर चरख्याचा वापर, त्यावर सूतकताई, आणि कापड निर्मितीसाठी धागा तयार करणे इत्यादी उपक्रम सर्वोदयाचे कार्यकर्ते राबवितात. या उपक्रमात अध्यक्ष बबनराव कानकिरड यांचा पुढाकार असतो. याच जिल्ह्यातील एक कार्यकर्ते प्रल्हाद नेमाडे आपल्या उरळ या गावी गेल्या अनेक वर्षांपासून कापूस ते कापडाचा प्रयोग करीत आहेत. स्वत:च्या ताकदीवर त्यांचा प्रयोग सुरू आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवत अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे खादी उत्पादन व प्रशिक्षणाचे प्रयतक सुरू आहेत. या सर्व गांधी विचारांशी समरस झालेल्या कार्यकर्त्यांना खऱ्या अर्थाने हातमाग दिन साजरा करण्याचा अधिकार पोहचतो. खादी हे केवळ वस्त्र नसून तो एक विचार आहे.त्यात कृषी अर्थव्यवस्थेचे सार आहे रोजगाराचे ते साधन आहे. सगळ्यात महत्वाचे म्हणजे ते पर्यावरण पूरक आणि आरोग्यदायी आहे. वर्षातून एक तरी खादीचे वस्त्र परिधान केल्यास रोजगारा सोबतच राष्ट्रीय कार्यास हातभार लागणार आहे. आचार्य विनोबा खादी संबंधी म्हणतात की,आपल्या घरात पाण्यासाठी नळ लागलेले असतात.पण पावसाच्या एका थेंबाचीही योग्यता त्या पाण्यात नसते. पावसाचा थेंब भलेही छोटा असेल पण तो सर्व ठिकाणी बरसतो. त्यामुळे त्यांची योग्यता मोठी आहे. चरख्यात हीच खुबी असून तो थोडी थोडी संपत्ती सर्वांच्या घरात पोहचवितो. अर्थ शास्त्राच्या नियमानुसार संपत्तीचे समान वाटप चरखा करू शकतो. मीलचा उत्पादित पैसा एकाच मालकाच्या खिशात जातो. पण खादी पैशाचे वितरण करते. फायदा थोडा होत असला तरी सर्वांना होतो हे महत्वाचे आहे. खादी समाजातील श्रमप्रतिष्ठेचे प्रतीक आहे. पण ते गावात रूजले पाहिजे. आज श्रमसाधना नाईलाजाने केली जाते. त्यातून सुटका करून घेण्यासाठी प्रत्येक जण धडपडत असतो.पण जोवर श्रमांना नैतिक, सामाजिक आणि आर्थिक अशा तिन्ही प्रकारची प्रतिष्ठा मिळत नाही तोवर परिवर्तन शक्य नाही.असे विनोबांचे म्हणणें आहे. पण आता श्रम प्रतिष्ठा समाजजीवनातून रजा घेत आहे. लोकानुनयामुळे सरकारने समाजाला ऐतखाऊ आणि लाचार बनविले आहे. असा लाचार समाज गावातील उद्योग जिवंत ठेऊ शकणार नाही. स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या काळात वस्त्रोद्योग पूर्णपणे लयाला गेला होता. कारण ब्रिटीशांनी तो ताब्यात घेतला होता. गांधीजींनी त्यात प्राण ओतला आणि संजीवनी दिली शिवाय खादीला स्वातंत्र्य लढ्याशी जोडले.ते संदर्भ आजच्या व्यवस्थेत कुठेच दिसत नाहीत म्हणूनच हातमाग दिन हा केवळ उपचार ठरला असून आपण राष्ट्रप्रेमी असल्याचा आव आणला जात आहे.तो दिन खऱ्या अर्थाने कुठलाही गाजावाजा न करता सेवाग्राम आश्रमात कृतितून साजरा होतो.

ग्रंथांद्वारे भारतीय संस्कृतीची विचारसंपदा समृध्द- डॉ.जोशी

सि.गो.पाटील महा.त कार्यक्रम; अनेक मान्यवरांची उपस्थिती

साक्री, दि.७ (प्रतिनिधी)- महर्षी व्यासांनी वेदांचे संकलन, संपादन आणि वर्गीकरण करून भारतीय ज्ञानपरंपरा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे ऐतिहासिक कार्य केले.महाभारत, अठरा पुराणे, ब्रह्मसूत्रे आणि श्रीमद्भागवत यांसारख्या महान ग्रंथांद्वारे त्यांनी भारतीय संस्कृतीची विचारसंपदा समृद्ध केली. त्यामुळे त्यांना भारतीय ज्ञानपरंपरेचे महान संपादक, संकलक आणि विश्वसाहित्याचे आद्य ग्रंथकार म्हणून गौरवले जाते,असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक डॉ प्रभाकर जोशी यांनी केले.

अखिल भारतीय साहित्य परिषद नवी दिल्ली पुरस्कृत धुळे जिल्हा साहित्य भारती व विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते भारतीय साहित्यातील महर्षी व्यासांचे योगदान या विषयावर बोलत होते. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्राचार्य डॉ. अनंत पाटील, प्रा.एल.जी.सोनवणे, डॉ. पापालाल पवार इतर मान्यवर उपस्थित होते.

डॉ.जोशी पुढे म्हणाले की,भारतीय संस्कृतीचा समृद्ध वारसा, ज्ञानपरंपरा आणि मूल्यव्यवस्था नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा व्याख्यानमाला आयोजित करणे ही काळाची गरज आहे. समाजात अनेक आव्हाने, बदलती शिक्षणव्यवस्था आणि कौटुंबिक संस्कारांची घटती परंपरा यामुळे तरुण पिढीसमोर आदर्शांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. अशा परिस्थितीत वैचारिक प्रबोधन करणाऱ्या व्याख्यानमाला युवकांना योग्य दिशा देणाऱ्या ठरत आहेत.भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव, गुरुपरंपरा, श्रावण महिन्यातील धार्मिक उपक्रम आणि देवी-देवतांच्या उपासनेमागील संस्कारमूल्ये यांचेही महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. बदलत्या काळात या परंपरा केवळ धार्मिक नसून समाजाला एकत्र ठेवणाऱ्या आणि मूल्यांची जपणूक करणाऱ्या आहेत, असे त्यांनी सांगितले.आयोजकांनी स्वत:च्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून समाजासाठी अशा व्याख्यानांचे आयोजन करणे ही मोठी सामाजिक जबाबदारी असल्याचे नमूद करत, या माध्यमातून भारतीय संस्कृतीची ओळख, राष्ट्रीय विचार आणि जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी साहित्य परिषद नवी दिल्ली व साहित्य भारती यांच्या उपक्रमाबद्दल माहिती देऊन समाजापर्यंत दर्जेदार साहित्य पोहोचवण्याचे कार्य संस्थेमार्फत केले जाते अशी माहिती दिली.

अध्यक्षीय मनोगतात चंद्रजीत पाटील म्हणाले की, समाजासाठी अशा व्याख्यानांचे आयोजन करणे ही मोठी सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.या माध्यमातून भारतीय संस्कृतीची ओळख, राष्ट्रीय विचार आणि जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले. संस्कृतीचे वैभव, वैदिक ज्ञानपरंपरा आणि महर्षी व्यासांनी दिलेला अमूल्य साहित्यवारसा यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले तर प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी साहित्यिक डॉ नरेंद्र खैरनार, सतीश पेंढारकर, महाविद्यालयातील प्राध्यापक यांनी प्रयत्न केले. सदर व्याख्यानासाठी साहित्यिक, प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थ्यांने व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

✻ धुळे दि.७- शहरात बऱ्याच प्रभागांमध्ये पाणी पुरवठ्यात आठ ते दहा दिवसांचा खंड पडल्याने पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागते आहे. पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी होत आहे.

टायटल व्हेरिफिकेशन नोटीस व जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व हितसंबंधितांना तसेच सर्व बँका, पतपेढ्या तथा इतर सर्व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) **मिळकतींचे वर्णन :** तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी मौजे देवपूर तालुका जिल्हा धुळे पैकी नेहरु हौसिंग सोसायटी मधील सर्व्हे नंबर २८/१ पैकी प्लॉट नं. ४१ पैकी हिस्सा ब व क बखळ प्लॉट एकूण क्षेत्रफळ : हिस्सा ब (१८X७० फुट) आणि हिस्सा क (१८X७० फुट) असे एकूण मिळून ३६ फुट रुंदी आणि ७० फुट लांबी, म्हणजेच २५२० चो. फुट क्षेत्रफळ असलेली बखळ जागा यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नंबर ४८, पश्चिमेस : ९ मीटर रस्ता व वापर, उत्तरेस : श्री. महेंद्र पुंडलिक कोठावदे यांचा हिस्सा, (२४ फुट रुंदी X ७० फुट लांबीचा भूखंड) दक्षिणेस : प्लॉट क्रमांक ४२.

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत ही **श्री. सुरेश पुंडलिक कोठावदे रा. धुळे ह. मु. नाशिक यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत आहे.** महसूल दप्तरी सिटी सर्व्हे उताऱ्यावर वर नमूद मिळकत धारक यांचे नाव मालक व कब्जेदार सदरी लागलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व पणनयोग्य असल्याचा भरवसा व खात्री सदर मिळकतधारक यांनी आमच्या पक्षकार यांना दिलेली आहे.

सदर मिळकत खरेदी करण्याबाबतची बोलणी आमच्या पक्षकारांनी वर नमूद मिळकतधारक यांच्याशी सुरु केली असून लवकरच आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदी खत करणार आहेत.

सबब सदर तिळकतीवर ज्या कोणत्याही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी, हितसंबंध तसेच विक्री, गहाण, वारसाहक्क, जप्ती, किंवा कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी असेल, अशा सर्व व्यक्तींनी त्यांचा आक्षेप/हरकत लेखी स्वरुपात पुष्ट्यर्थ सत्यप्रत कागदपत्रांसोबत निम्मलिखित स्वाक्षरीकारांकडे त्यांच्या खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सदरची नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात)दिवसाच्या आत नोंदवाव्यात.

सदर मुदतीत कोणाचीही आक्षेप/हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध व बोजा विरहित, हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या तसेच कागदपत्राशिवाय आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच आमच्या पक्षकार यांनी सदर व्यवहार पूर्ण केल्यावर आलेल्या हरकती आमच्या पक्षकार यांच्यावर आणि वर नमूद मिळकतींवर बंधनकारक राहणार नाहीत.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन तसेच दाखवलेल्या कागदपत्रांवरुन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

कळावे ही जाहीर नोटीस, धुळे दि. ७/०८/२०२६

ॲड. विशाल शरद भट, मो.९३२६१९८१७९

कार्यालय : ३८, जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे

जाहीर नोटीस

ॲड. बिना प्रकाश देशमुख
नोटरी भारत सरकार धुळे
निशाणी नं. ६

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ८४०/२०२६

शांताबाई भिका पाटील, वगैरे ...अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ....जाबदेणार

कै. भिका उत्तम पाटील

(मृत्यू दि. ०१/०७/२०२६ ... मयत

कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी

(Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. भिका उत्तम पाटील यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथील मे. दिवाणी न्याया. सो. क. स्तर कोर्ट नं. २ यांचे कोर्टात दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. कोर्टात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर राहून सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरुपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरुपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकश होवून वरील अर्जदार यांना मयत मयत कै. भिका उत्तम पाटील यांचे कायदेशीर वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला **(Legal Heirship Certificate)** देणेबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत ऐकून घेतली जाणार नाही व ग्राह्य धरण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. ०४/०८/२०२६ रोजी प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरुन
सही...
अधिकारी
दिवाणी न्यायालय, व.स्तर धुळे

शिक्का

सही...
कामगिरी कारकुन
दिवाणी न्यायालय, व.स्तर धुळे

पान १ वरुन

धुळ्यात सण-उत्सवांच्या

दोंडाईचा ता. शिंदखेडा), चॅम्पियनसिंग मिलनसिंग भादा (२४), मोना खालीद पिंजारी (२१, रा.दिडशे खोली, वनश्री कॉलनी, मोहाडी), फतेसिंग मिलनसिंग भादा (२०,रा. मोहाडी), कृष्णा जामसिंग पारधी (३२, उंटावद ता. शिरपूर), अनिल जामसिंग पारधी (२९), हाशीम मलक अब्दुल रहेमान (३२, मिल्लतनगर, शंभर फुटीरोड, धुळे), खुशाल ऊर्फ दादु परमेश्वर गोसावी (१९, मालपूर ता. शिंदखेडा), भाईदास आकाश मोरे (२९, आमोदा ता. शिरपूर), विजय श्रावण नेतले (२५, संत कबीरदास नगर, दोंडाईचा), स्वप्निल बबन घोलप (२१, नरडाणा ता. शिंदखेडा),शुभम शरद माळी (२८, भंडारी टॉकीज जवळ, शिरपूर) या हद्दपार गुन्हेगारांना त्यांच्याविरुध्द लागू असलेल्या हद्दपारीच्या कालावधीत धुळे जिल्हयाच्या सरहद्दीत प्रवेश करणे, वास्तव्य करणे अथवा कोणत्याही प्रकारे वावर करण्यास सक्त मनाई आहे. हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन करणे गंभीर व दखलपात्र गुन्हा आहे. हद्दपार गुन्हेगार वावरताना आढळल्यास त्याबाबतची माहिती तात्काळ पोलीस प्रशासनास द्यावी. माहिती देणाऱ्याचे नागरिकाचे नाव व ओळख पुर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले.

जाहीर नोटीस

नि. ६/ड

शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. २५८/२०२६
नि.नं. ६ चौ. ता. ८/९/२०२६

१) रेखा सतिष ठाकरे, रा. शिवकृपा कॉलनी शहादा जि. नंदुरबार
२) रमेश उत्तम राजे (मयत)
२-अ) आशा रमेश राजे, २-ब) भटू रमेश राजे
नं. २-अ व २-ब रा. वायपूर ता. शिंदखेडा जि. धुळे
२-क) वैशाली ऋषिकेश जावध रा. १६७/२, प्लॉट नं. ४१, सुप्रिम कॉलनी, एमआयडीसी जळगांव
२-ड) सुरेखा लिलाचंद पवार रा. ज्ञानेश्वर चौक, फागणे ता. जि. धुळे
२-इ) सोनी उर्फ मनिषा लोटन सोनवणे रा. गोपाळ नगर, लोणखेडा ता. शहादा जि. नंदुरबार
३) सुधाकर उत्तम राजे मयत ३-अ) शोभाबाई सुधाकर राजे,
३-ब) मुकेश सुधाकर राजे, ३-क) कैलास सुधाकर राजे,
नं. ३-अ व ३- क रा. वायपूर ता. शिंदखेडा जि. धुळे
३-ड) संगिता योगेश कुवर
रा. सत्यम शिवंम सुंदरम सोसायटी गणेशनगर, पेराणे तो. जि. पुणे. ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार
उत्तम गजमल राजे मयताचा पत्ता : वायपूर ता. शिंदखेडा जि. धुळे
मृत्यू दि. १०/१२/२०१० ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे वडील, अर्जदार नं. २ अ अर्जदार नं. ३ अ यांचे सासरे, अर्जदार नं. २ब ते २ इ तसेच अर्जदार नं. ३ब ते ३ ड यांचे आजोबा नामे उत्तम गजमल राजे हे दि. १०/१२/२०१० रोजी मौजे वायपूर ता. शिंदखेडा जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. ०८/०९/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदार व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही, असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर शिंदखेडा जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरुन
सही...
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, शिंदखेडा

कोर्टाचा शिक्का

सही...
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय शिंदखेडा

वाहनाची धडक तरुणाचा मृत्यू

धुळे, दि.७- शहरातील बारा पत्थर चौकात कारने दिलेल्या धडकेत तरुण गंभीर जखमी होऊन ठार झाल्याची घटना आज सायंकाळी घडली. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

शहरातील बारा पत्थर चौकात रस्ता ओलांडणाऱ्या पादचारी तरुणास भरधाव कारने धडक दिल्याची घटना सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. घटनास्थळी परिसरातील नागरिकांनी धाव घेत जखमीस श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय दाखल केले. धुळे शहर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. जखमीस गंभीर दुखापत झाल्याने रात्री उशिरा त्यांचा मृत्यू झाल्याचे शहर पोलिसांकडून सांगण्यात आले. रात्री उशिरापर्यंत घटनेची नोंद करण्याचे काम सुरू असल्याने मृताचे नाव समजू शकले नाही.

प्रकाश में आज साऊंथ की सुपरमुवी



रेखा अनिल कपूर, राज बब्बर, रिचा शर्मा, कादर खान, अरुणा ईराणी

शब्दकोडे क्रमांक : २४२८



आडवे शब्द : १.चपला २.मुंबईला पाणीपुरवठा करणारा पश्चिम किनारपट्टीवरील एक तलाव ५.प्राण्यांची किंवा पक्ष्यांची लहान मुले/बच्चे कंपनी ८.आवड ९.ढीग १०.फुलातील रजकण ११.एक संन्यासी पंथ १३.किनार १५.जखमेवर लावावयाचे स्निग्ध औषध १७.सक्ती १९.खारट चवीचा २०.भाजी २२.कुटील डाव २४.नौका स्वतःस उद्देशून वापरला जाणारा एकवचनी शब्द २६.हतप्रभ २७.भांडे २९.पती ३०.वेगळा ३२.वावर ३३.किंतु ३४.एकाच मापाइतके ३५.मोठा ३७.रक्त वाढीस पोषक असलेली एक फळ भाजी ३८.धनुष्य ४०.वारा ४३.एखाद्यास आदराने लवून केलेला नमस्कार ४६.दमयंतीचा पती ४७.आवडत नसलेला ४९.सुरांची लय ५१.अभिनेता ५२.पाणी ५३.चोप ५४.नेदरलँडचे निवासी

उभे शब्द : १.हाताचा अंगठा आणि करंगळी यांमधील अंतर ३.जर-विरुद्ध ४.जीभ ५.रंग उडवण्यासाठी वापरतात ६.चोपडी ७.कर्तृत्व १०.क्षण १२.सागराच्या लाटांचा नाद १४.अतिभव्य १५.मौज १६.हाक १८.कपाळावर येणारा केसांचा झुपका १९.तुटलेल्या मडक्याचा तुकडा २१.रत्न २२.भांडखोर स्त्री २३.जितेंद्र, आशा पारेख यांचा एक सिनेमा २६.लाटणी २८.छवी ३०.आगाऊ ठेव ३१.संचार ३४.विषमता-विरुद्ध ३६.बसण्याचे साधन ३९.न्हाव्याचे अस्त्र ४१.मेळ ४२.शिकार ४४.एक कडधान्य ४५.नारळाचा एक भाग ४८.कंटाळवाणे-इंग्रजीत ५०.स्पर्श-इंग्रजीत

शब्दकोडे क्रमांक : २४२७ चे उत्तर

वि	धा	न	स	भा	■	ति	ट	का	रा	■	वि
चा	रा	■	भा	■	का	ढा	■	ठी	■	ना	क
र	■	क	मं	ड	ल	■	अ	■	प	रा	त
वं	श	■	ड	■	वा	ग	णू	क	■	ज	■
त	■	स	प	क	■	वा	रे	मा	प	■	वि
■	नां	दी	■	ला	भ	■	णू	■	ट	पो	रा
रं	ग	■	का	का	■	ह	■	ता	क	■	ना
गा	र	ठा	■	र	वि	वा	र	■	न	व	■
री	■	व	ड	■	ट	मा	ट	र	■	य	क्ष
■	वि	■	र	ती	■	न	र	■	र	मा	■
म	हा	न	■	स	सा	■	ट	न	■	न	भ
स	र	ग	मं	■	फ	ळा	■	फा	र	■	ट

शिंदखेडा तालुका विज्ञान मंडळाची सहविचार सभा

शिंदखेडा दि.७- येथील पंचायत समिती शिक्षण विभाग व तालुका मुख्याध्यापक संघ ,तालुका विज्ञान गणित अध्यापक संघ शिंदखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती कार्यालय शिंदखेडा येथे तालुकास्तरीय सहविचार सभा संपन्न झाली.

पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी श्री. डी एस सोनवणे हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते तर सदर सभेस धुळे जिल्हा विज्ञान संघ सचिव श्री एस एस गोसावी, उपाध्यक्ष श्री जे डी भदाणे शिंदखेडा तालुका मुख्याध्यापक संघ सचिव श्री.एम.डी पाटील, तालुका विज्ञान मंडळ अध्यक्ष श्री एस एन माळी सचिव श्री ए टी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. सभेत या शैक्षणिक वर्षात संपन्न होणाऱ्या शिंदखेडा तालुका स्तरीय विज्ञान मेळावा व नाट्य महोत्सव या विषयावर चर्चा करण्यात आली तसेच वर्षभरात घेण्यात आलेल्या विज्ञान व गणित उपक्रमांची माहिती मांडण्यात आली.शैक्षणिक वर्ष २०२६ करिता अखिल भारतीय तालुकास्तरीय विज्ञान मेळावा हा १८ ऑगस्ट रोजी श्री स्वामी समर्थ विद्यालय शिंदखेडा येथे तर नाट्य महोत्सव २७ ऑगस्ट रोजी गो सो देवकर विद्यालय विरदेल येथे घेण्यासंदर्भात विचार झाला.तरी शिंदखेडा तालुक्यातील जास्तीत जास्त माध्यमिक शाळांनी यात सहभाग नोंदवावा असे आवाहन गटशिक्षणाधिकारी श्री.डी एस सोनवणे यांनी केले आहे.

अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशन तर्फे आर.सी.पटेल आश्रमशाळेत आरोग्य शिबिर

शिरपूर, दि.७- अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या वतीने आर. सी. पटेल आश्रम शाळा, असली येथे किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व वैयक्तिक स्वच्छता या विषयावर आरोग्य व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये इयत्ता पाचवी ते नववीच्या सुमारे १०० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

शिबिरात मार्गदर्शक म्हणून डॉ. मोनिका अग्रवाल यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत मासिक पाळी ही स्त्रीच्या जीवनातील नैसर्गिक जैविक प्रक्रिया असल्याचे सांगितले. या काळात घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व, सॅनिटरी पॅडचा योग्य वापर व सुरक्षित विल्हेवाट, संसर्गापासून बचाव, रक्तक्षय टाळण्यासाठी पौष्टिक आहाराचे महत्त्व तसेच आरोग्यदायी सवयी याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या संचालिका सौ. कृतीबेन भूपेशभाई पटेल, सीईओ डॉ.उमेश शर्मा, समन्वयिका सौ. सोनिया भसीन यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मुख्याध्यापक भूषण पेंढाकार, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी, अस्तित्व फाऊंडेशनच्या टीमचे सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ. भावना पाटील यांनी केले.

जाहीर नोटीस

